**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२४५/२०१७ मधील निशाणी क्र.४९ वरील आदेश</u>:**

१. प्रतिवादी नं. ६ व ७ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ९-अ (महाराष्ट्र दुरुस्ती नुसार ) न्यायालयाचे हा दावा चालविण्याचे अधिकार क्षेत्राबाबत प्राथमिक मुददा काढून त्याची प्रथम सुनावणी घेण्याबाबत व दावा निकाली काढण्याबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादी नं. ६ व ७ च्या मते प्रतिवादी नं. ६ व ७ ही महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा १९६० अन्वये नोंदणीकृत सहकारी संस्था आहे. दाव्यात उपस्थित वाद हा संस्थेचे कामकाज, कारभार व व्यवसाय यास निगडीत आहे. त्यामुळे हा दावा चालविण्याचा न्यायाधिकार या न्यायालयास नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्थंचा कायदा १९६० चे कलम १६४ नुसार दावा दाखल करणेपुर्वी आवश्यक ती नोटीस निबंधक यांना वादींनी दिलेली नाही. नोटीस अभावी दावा चालु शकत नाही.

३. प्रतिवादी नं. ६ व ७ यांची अशीही तक्रार आहे की, ज्या ग्रामपंचायत नोंदीद्वारे प्रतिवादी नं. ६ व ७ चे नांव दावा मिळकतीचे रेकॉर्डला मालकी सदरी लागले, त्या नोंदीस या दाव्यात आव्हान केलेले आहे. परंतु महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम कलम १५८ नुसार सदरचा वाद चालविण्याचा न्यायाधिकार केवळ महसुल अधिकारी यांना आहे.

४. प्रतिवादी नं. ६ व ७ च्या मते वरील प्रश्न हे प्राथमिक सुनावणीद्वारे निकाली काढणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रस्तुतचा अर्ज आहे.

५. वादींनी सदर अर्जास हरकत घेतली असुन वादींचे मते ते प्रतिवादी नं. ६ व ७ चे सभासद नाहीत. दाव्यात उपस्थित केलेला वाद हा प्रतिवादी नं. ६ व ७ या संस्थेचा कारभार, कामकाज व व्यवसाय याचेशी संबंधित नाही. ज्या जागेवर प्रतिवादी नं. ६ व ७ या संस्थेचे इमारतीचे बांधकाम सुरु आहे, त्या जागेचा मालकी हक्क हा वाद विषय आहे. तो संस्थेच्या कारभार, कामकाज व व्यवसायाशी संबंधित नाही. त्यामुळे दावा चालविण्याचा न्यायाधिकार दिवाणी न्यायालयास आहे. महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा १९६० चे कलम १६४ नुसार कोणतीही आगाऊ नोटीस प्रतिवादी नं. ६ व ७ यांना देण्याचे कारण नाही. दाव्यात उपस्थित

केलेले प्रश्न महसुल खात्याचे कर्मचारी निकाली काढु शकत नाहीत. वादींनी अर्ज फेटाळण्यास विनंती केली आहे.

६. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व अभिलेख यांची पहाणी केली. त्यावरुन खालील वादप्रश्न उपस्थित होतात. त्यास दिलेले निष्कर्ष व त्याबाबतची कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ९-अ नुसार प्राथमिक मुददे काढणे आवश्यक व गरजेचे आहे काय ? | नकारार्थी |
| २) | काय आदेश? | अर्ज नामंजुर करण्यांत येत आहे. |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ बाबत :**

७. प्रतिवादी नं. ६ व ७ च्या मते खालील कारणास्तव हा दावा चालविण्याचा न्यायाधिकार या न्यायालयास नाही.

अ. प्रतिवादी नं. ६ व ७ ही सहकारी संस्था असुन दाव्यात उपस्थित वाद हा संस्थेचा कारभार, कामकाज व व्यवसाय याचेशी निगडीत असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा १९६० चे कलम १६३ नुसार हा दावा या न्यायालयात चालु शकत नाही.

ब. दाव्यात आव्हान दिलेल्या नोंदीबाबत तक्रार करणेसाठी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम चे कलम १५८ नुसार स्वतंत्र कार्यप्रणाली आहे. त्यामुळे त्या नोंदीबाबत निकाल देण्याचा दिवाणी न्यायालयास न्यायाधिकार नाही.

क. महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा १९६० कलम १६४ नुसार आगाऊ नोटीस निबंधक, सहकारी संस्था यांना देण्यांत आली नाही.

वर कलम ७ अ व क मध्ये नमुद प्रश्न या दाव्यात उपस्थित होतात काय? हे प्रथम पहाणे आवश्यक व गरजेचे आहे. वादी प्रतिवादी नं. ६ व ७ संस्थेचे सभासद नाहीत. प्रतिवादी नं.

६ व ७ ही विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था असुन तिचा उद्देश शेतकरी सभासदांना विविध सोयी व सेवा पुरविणे असा आहे. संस्थेच्या इमारतीचे बांधकाम हा संस्थेचा कारभार, कामकाज व व्यवसाय होऊ शकत नाही. तिचे इमारतीचे प्रश्न तिचे व्यवसायाशी निगडीत आहे असेही म्हणता येणार नाही. संस्था मालकीचे इमारतीत चालवावी अगर भाडेतत्त्वावरील जागेत चालवावी यासाठी संस्थेच्या पोटनियमात कोणतीही तरतुद नाही. तिचे पोटनियमानुसार तिची स्वतंत्र इमारत असावी व इमारतीचा वाद हा तिचे कामकाजाशी निगडीत राहिल अशी कोणतीही तरतुद पोटनियमात नाही. केवळ प्रतिवादी नं. ६ व ७ सहकारी संस्था आहे म्हणुन तिचे कोणतेही कामकाज जसे स्वत:ची इमारत उभारणे हे महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा १९६० कलम ९१ व १६३ नुसार संस्थेच्या व्यवसायाशी निगडीत असे ठरत नाही. त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा १९६० कलम ९१ व १६३ नुसार विशेषाधिकार प्रतिवादी नं. ६ व ७ संस्था मागु शकत नाही. दाव्यातील विषय संस्थेचा उद्देश व पोटनियम यांचेशी संबंधित नाही. त्यामुळे सदर दाव्यास महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा १९६० चे कलम १६३ ची सकृतदर्शनी बाधा दिसुन येत नाही. त्यामुळे न्यायालयाचे न्यायाधिकाराचा प्राथमिक मुद्दा सुध्दा काढण्याची आवश्यकता व गरज दिसत नाही. वरील विवेचनानुसार महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा १९६० चे कलम १६४ प्रमाणे नोटीस देण्याची आवश्यकता व गरज सकृतदर्शनी दिसुन येत नाही. प्रतिवादी नं. ६ व ७ यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खालील न्यायनिवाडे दाखवुन त्यांचा अर्ज कसा संयुक्तीक आहे, हे दर्शविण्याचा प्रयत्न केला.

**अ. सुप्रभात सहकारी गृहनिर्माण संस्था विरुध्द स्पॅन बिल्डर्स, २००२, (६) महा. लॉ. जर्नल पान ८३७**

**ब. गुरुदेव डेव्लपर्स विरुध्द कुर्ला कोंकण निवास सहकारी गृहनिर्माण संस्था, २०००, (३) महा. लॉ. जर्नल पान १३१.**

वरील प्रकरणांत सहकारी संस्थेचा उद्देशाशी संबंधित वाद असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा १९६० चे कलम १६४ नुसार नोटीस आवश्यक असल्याचे मत मा. उच्च न्यायालयाने नोंदविले आहे. परंतु संस्थेची इमारत उभी करणे हा प्रतिवादी संस्थेचा उद्देश नसल्याने वरील मत या प्रतिवादींचे मदतीचे नाही.

तरी सुध्दा आवश्यकता व गरज भासल्यास, सदरचा प्रश्न दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम २ नुसार मुळ दाव्याचे सुनावणीचे वेळी निकाली काढला जाऊ शकतो. हा प्रश्न प्राथमिक स्वरुपाचा प्रश्न ठरत नाही.

८. दाव्यात मुळ प्रश्न दावा मिळकतीचे मालकीचा आहे. वादींचे मते दावा जागा भावडी ग्रामपंचायतीचे मालकीची आहे. प्रतिवादी नं. ५ ते ७ च्या मते ती प्रतिवादी नं. ५ चे मालकीची होती व आता बक्षीसपत्रानुसार संस्थेच्या मालकीची आहे. त्यामुळे दावा जागेची मालकी ठरविण्याचा न्यायाधिकार केवळ दिवाणी न्यायालयास असुन तो मालकीचा प्रश्न अन्य कोणत्याही न्यायालयाद्वारे निकाली निघु शकत नाही. केवळ अंतर्गत प्रश्न म्हणुन ग्रामपंचायतीच्या नोंदीच्या वैधतेबाबत वादींनी प्रश्न उपस्थित केला म्हणुन दिवाणी न्यायालयाचा न्यायाधिकार काढुन घेऊन महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमचे कलम १५८ नुसार तो अधिकार महसुल अधिका-यांना मिळतो असे म्हणता येणार नाही. महसुल अधिका-यांना जमीनीची मालकी ठरविण्याचा अधिकार नाही. तो केवळ दिवाणी न्यायालयास आहे. या सर्व बाबींमुळे मुळात दिवाणी प्रक्रिया संहित कलम ९-अ नुसार प्राथमिक मुद्दे काढणेची सुध्दा आवश्यकता व गरज दिसत नाही. अशा प्रकारे मुद्दे काढुन त्यावर मत प्रदर्शित करणे हा न्यायालयाचे वेळेचा अपव्यय होईल. सकृतदर्शनी असे प्रश्न उपस्थित करुन त्याचे निराकरण करण्याची कोणतीही गरज व आवश्यकता दिसुन येत नाही. त्यामुळे वादप्रश्न १ यांस नकारार्थी उत्तर देण्यात येत आहे.

**<u>वादप्रश्न क्र.२ बाबत</u> :**

९. वादप्रश्न क्रमांक १ च्या निष्कर्षानुसार मुळात प्रतिवादी नं. ६ व ७ यांनी उपस्थित केलेले प्राथमिक मुद्दे काढण्याची मुळात आवश्यकता व गरज नसल्याने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहे.

**: <u>आदेश</u> :**

१. प्रतिवादी नं. ६ व ७ यांचा निशाणी नंबर ४९ चा अर्ज नामंजुर करण्यांत येत आहे.

२. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

(हेमंत सुरेश सातभाई)
दिवाणी न्यायाधीश(वरिष्ठ स्तर)
श्रीगोंदा.

दिनांक : १२/०१/२०१८.